हिंगोली जिल्ह्याचा बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक : तालुका निहाय अभ्यास. (2015 - 2022)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयाच्या पीएच. डी.

पदवी साठी चा शोध प्रबंध आराखडा.

-:संशोधक :-

चव्हाण उदयराज चंदन

-:मार्गदर्शक:-

प्रा. डॉ. बिरादार. एम. एन.

सहयोगी प्राध्यापक.
(अर्थशास्त्र)

दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर,
ता. भोकर जि. नांदेड.

संशोधन केंद्र,
सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

हिंगोली जिल्ह्याचा बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक : तालुका निहाय अभ्यास.

(2015 - 2022)

प्रस्तावना:-

मानवाच्या मूलभूत गरजा जसे, अन्न, वस्त्र, निवारा भागविण्यासाठी उपलब्ध होणारी साधने जी व्यक्ती मिळवू शकत नाही, त्याला आपण दारिद्र्य असे म्हणतो. जागतिक संपत्ती अहवालानुसार, जगातील 95% टक्के संपत्ती हि 5% टक्के श्रीमंत वर्गाकडे आहे. भारत हा जगातील दूसऱ्या क्रमांकाचा क्षेत्रीय असमानता असलेला देश आहे. जेव्हा समाजाचा एक मोठा गट जीवनाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी अपयशी ठरतो, तेव्हा अशा स्थितीला जन दारिद्र्य (mass poverty) असे म्हणतात. अशा वेळी दारिद्र्य ही एक समस्या बनते. भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यासाठी दारिद्र्य रेषा या संकल्पनेचा वापर केला जातो. दारिद्र्य रेषा उत्पन्न किंवा उपभोग खर्चाच्या आधारावर ठरवली जाऊ शकते. दारिद्र्य रेषा ठरवण्यासाठी एका व्यक्तीमागे एका महिन्याच्या उपभोग खर्चाच्या एक न्यून स्तर निश्चित केला जातो. त्याला मासिक 'प्रतिव्यक्ती उपभोग खर्च' म्हणून संबोधले जाते. या न्यून स्तरापेक्षा कमी उपभोग खर्च करणाऱ्या व्यक्तीला गरीब किवा 'दारिद्र्य रेषेखालील' व्यक्ती/कुटुंबे (below poverty line) असे संबोधले जाते, तर त्यापेक्षा अधिक खर्च करणाऱ्या व्यक्ती / कुटुंबाना 'दारिद्र्य रेषेवरील' (above poverty line) म्हणून संबोधले जाते. दारिद्र्य ही समस्या नुसते भारतात आहे. असे नाही. तर तिचे स्वरूप जागितक आहे. जसे, विकसनशील देशामध्ये आपल्या गरिबी आढळून येते. भारतामध्ये दारिद्र्य मोजमाप करण्या संदर्भात पहिला विशिष्ट आणि वैज्ञानिक प्रयत्न जुलै १९६२ मध्ये भारत सरकारने स्थापन केलेल्या नियोजन आयोग कार्य गटाने भारतीय वैध्यकीय संशोधन परिषद (ICMR) च्या आव्हालाचे निकष वापरून गरिबी मोजमाप करण्यात आले. या समितीने किमान २० रु दरडोई दरमहा उत्पन्न विचारात घेवून गरीबीचे प्रमाण सांगण्यात आले. नंतर १९७१ मध्ये दांडेकर आणि रथ यांनी उष्माक कॅलरी या घटकावर मोजमाप केले. त्यांनी ग्रामीण आणि शहरी या दोन भागामध्ये कॅलरीचे मापन सांगितले. दांडेकर आणि रथ यांनी ग्रामीण भागासाठी २४०० कॅलरी प्रती व्यक्ति प्रती दिन तर, शहरी भागासाठी २१०० कॅलरी प्रती व्यक्ति प्रती दिन हे निकष ठरवून दारिद्र्य याचे मोजमाप केले. म्हणजेच जि, व्यक्ती/कुटुंब किमान ग्रामीण भागातील २१०० कॅलरी आणि शहरी भागातील २४०० कॅलरी कमी उपभोग घेत असेल तर ते गरीब आहे. असे आपल्याला दांडेकर आणि रथ यांनी ठरवलेल्या मापकावरून वरून लक्षात येते. कॅलरी निकषाचे मौद्रिक सममूल्य निश्चत करण्यासाठी (NSSO) च्या २८ व्या फेरीचे १९७३-७४ घरगुती उपभोग खर्च आकडे वापरण्यात आले. त्यावरून एवढी कॅलरी ऊर्जा मिळवून देणारा उपभोग खर्च ग्रामीण भागासाठी ४९.०९/-रु. आणि शहरी भागासाठी ५६.६४/-रु. हे निकष वापरून राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण कार्यालय दारिद्र्याचे मोजमाप केले. भारतामध्ये राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण कार्यालय दारिद्र्या ची गणना करते, दर पाच वर्षानी दारिद्र्य विषयक (nsso) राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण कार्यालय मार्फत केले जाते. निरपेक्ष दारिद्र्य हि संकल्पना जीवनासाठी (उपभोग खर्चाच्या संदभार्त मोजली जाणारी) परिपूर्ण मापकावर आधारित आहे. भारताने निरपेक्ष दारिद्र्याचा स्वीकार केला होता. भारतामध्ये आतापर्यंत उत्पन्न , उपभोग , दरडोई उत्पन्न, शिक्षण इत्यादी. घटकाचा अभ्यास करून गरिबी चा अभ्यास केला आहे. १९९० मध्ये स्थापन झालेल्या मानव विकास निर्देशांक ने सुचवले की गरिबी चा निर्देशांक काढण्यात यावे मग १९९७ पासून मानव विकास निर्देशांक प्रमाणे मानवी दारिद्र्य निर्देशांक काढण्यात येवू लागला. परंतु, तरही आपण दारिद्र्याचा तफावत दूर करू शकलो नाही. त्यासाठी आपल्याला दारिद्र्याचा विविध अंगाने अभ्यास करणे गरजेचे आहे तरच, आपण दारिद्र्य नाहीसे करू शकू. थोडक्यात, विश्लेषण करायचे झाले, तर सुरवातीला दारिद्र्य हे उपभोगावर आणि उत्पन्नावर मोजले जात होते. सूत्र एकूण उत्पन्न / एकूण लोकसंख्या उदा. समजा 'अ' या कुटुंबात पाच सदस्य आहे व 'ब' या कुटुंबात दहा सदस्य आहे दोन्ही कुटुंबाचे उत्पन्न महिना ७,०००/- रु. तर 'अ' कुटुंबातील व्यक्ती प्रत्येकी १,४००/- रु. आपल्या उपभोगावर खर्च करू शकतो. पण 'ब' कुटुंबातील व्यक्ती ७,००/- रु. प्रत्येकी उपभोगावर खर्च करू शकतो. म्हणजेच सदस्य संख्या जास्त असल्या कारणाने 'अ' व 'ब' कुटुंबातील रहाणीमानात

फरक दिसून येतो. 'अ' कुटुंब जितके शिक्षण, आरोग्य, रहाणीमान वर खर्च करतो तितके 'ब' कुटुंबातील व्यक्ती करू शकत नाही. म्हणजेच याठिकाणी दोन्ही कुटुंबाचे उत्पन्न जरी सारखे असले तर मात्र, रहाणीमानात 'अ' कुटुंबाचा खर्च अधिक आहे. आणि 'ब' कुटुंबाचा राहणीमानवर खर्च करण्याची क्षमता कमी आहे. हा राहणीमानातील फरक दिसून येतो. पुढे काळाची गरज पाहून राहणीमान या घटकाचा समावेश करण्यात आला. मानवी विकास अहवालाचा आधार घेवून शिक्षण, आरोग्य, राहणीमान या घटकावरून किती लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत हे ढोबळ मानाने सांगण्यात आले. ऐकूनच या निकषावर आधारित तीन मुख्य घटक व व इतर उपघटक विचारात घेऊन दारिद्र्य मोजमाप करण्याचा विचार पुढे आला. त्यालाच बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक असे म्हणतात. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक ही संकल्पना ऑक्सफर्ड विध्यापिठातील अर्थशास्त्र संशोधन केंद्राच्या संचालिका सबिना अलकिरी यांनी प्रथम २०१० मध्ये माडंली. Oxford Poverty and Human Inititative (OPHI) या केंद्रामार्फत पहिला जागतिक बहुआयमी दारिद्र्य निर्देशांक संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत मानव विकास अहवालाकरिता तयार करण्यात आला. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक या संकल्पनेचा वापर करून हिंगोली जिल्ह्याचा बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक : तालुका निहाय अभ्यास केला जाणार आहे.

बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाचे घटक :-

१) शिक्षण :- शालेय वर्ष , शाळेतील उपस्थिती.

२) आरोग्य :- बालमृत्युदर , कुपोषित बालक.

३) राहणीमान :- वीज पुरवठा , पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, इंधन ,घरावरील छत, मालमत्ता.

दारिद्र्य व्याख्या :-

१). अमर्त्य सेन :- एखाद्या व्यक्तीला त्यांनी जोपासलेल्या मूल्याप्रमाणे जगता न येणे म्हणजेच दारिद्य होय.
२). जागतिक विकास अहवालानुसार :- दारिद्य म्हणजे योग्य पद्धतीने अन्न ,वस्त्र ,निवारा यांचा अभाव ही अशी व्यक्ति स्थिती आहे. की, त्या व्यक्तीस सुयोग पद्धतीने शिक्षण, आरोग्य, राहणीमान , पायाभूत सुविधा, दरडोई उत्पन्न, सुव्यवस्थित घरे , पिण्याचे पाण्याची सुविधा इत्यादी मिळत नाही, त्याला बहुआयामी दारिद्य असे म्हणतात.
३). ॲडम स्मिथ :- ज्या व्यक्तीस उत्तम प्रकारचे जीवन जगण्यासाठी आवश्यक त्या वस्तूंचा पुरवठा करता येत नसल्यामुळे गुणवत्ताहीन वस्तूवर जगतात त्यांना दारिद्य असे म्हणतात.

दारिद्र्याचे प्रकार :-

१). सापेक्ष दारिद्र्य ***:- देशातील उच्चतम 5 किवा १० टक्के लोकसंख्येची संपत्ती उत्पन्न किवा उपभोगाच्या तुलेनेत देशातील न्यूनतम 5 किवा १० टक्के लोकसंख्येची संपत्ती उत्पन्न किवा उपभोगाचे मोजमाप केल्यास त्यास सापेक्ष दारिद्य असे म्हणतात. सापेक्ष दारिद्यात मार्फत देशातील संपत्ती, उत्पन्न किवा उपभोगाच्या वितरणातील विषमतेचे चित्र स्पष्ट होते.***

२). निरपेक्ष दारिद्र्य ***:- दारिद्याचे प्रमाण निरपेक्ष मोजमाप करण्यासाठी देशातील जीवनमान खर्चाचा विचार करून त्य आधारावर एक न्यूनतम उपभोग स्तर निर्धारित केला जातो. भारतासारख्या विकसनशील देशात निरपेक्ष दारिद्य आढळून येते.***

हिंगोली जिल्ह्याची पार्श्वभूमी:-

हिंगोली जिल्हा हा परभणी जिल्ह्याचे विभाजन होवून दि. 1 मे 1999 रोजी अस्तीत्वात आला आहे. महाराष्ट्रामध्ये मराठवाडा हा एक स्वतंत्र प्रदेश असून तो महाराष्ट्राच्या प्रशासकीय विभागापैकी एक आहे. मराठवाड्यामध्ये औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बीड, उस्मानाबाद असे आठ जिल्हे आहेत. या आठ जिल्ह्यात पैकी हिंगोली हा एक जिल्हा आहे. प्राचीन काळात विंगुलि, विंग , मुल्ह , लिंगोली असा उल्लेख हिंगोलीचा आहे. हिंगोली हे तत्कालीन वाशिम जिल्ह्यातील नरसी परगण्यातील एक गाव होते हिंगोली येथे मुख्यत्वे निजामाने 1903 मध्ये लष्करी तळ स्थापन केला.

आज आजही हिंगोली शहरात पलटण, तोफखाना, पॅशनपुरा सदर बाजार रिसाला, अश्वशाळा, गोलंदाज गल्ली, जिनकर गल्ली, इत्यादी. लष्करी कालव्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या वसाहतीचा उल्लेख आढळून येतो. आज हिंगोली ही व्यापारी पेठ असून जिल्ह्यातील औंढा नागनाथ मंदिरासाठी देखील प्रसिद्ध आहे. हिंगोली हे नांदेड अकोला महामार्गावरील महत्त्वाचे ठिकाण आहे. हिंगोली जिल्हा १९.०५ उत्तर ते २०.०५ उत्तर या अक्षावर आणि ७६.३० पूर्व ते ७७.३० पूर्व रेखांक्षावर वसलेला आहे. जिल्ह्याचा उत्तरेस बुलढाणा आणि वाशिम, पूर्वेस यवतमाळ आणि नांदेड, दक्षिणेस नांदेड आणि परभणी, तर पश्चिमेस परभणी आणि जालना जिल्ह्याच्या सीमा आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ४८२७ किलोमीटर असून ते महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत १.५७% इतके आहे.

हिंगोली जिल्ह्याचा प्रदेश हा गोदावरी खोऱ्यात येत असला, तरी पैनगंगा खोऱ्यातील कयाधू व पूर्णा या उपखोऱ्यात समावेश होतो. समुद्रसपाटीपासून सर्वसाधारण उंची ५०० मीटर आहे. माळहिवरा परिसरामध्ये ती ५९८ मीटर पर्यंत उच्च आहे. वसमत परिसरात ती काही ठिकाणे ४०० मीटर पर्यंत खाली आहे. माळ हिवऱ्याची डोंगररांगा पेनगंगा व कयाधुचे खोरे वेगळे करते. जिल्ह्यातील भूप्रदेश प्रामुख्याने नैसर्गिक घटकांचा प्रभाव घेऊन व झिजेमुळे तयार झालेला उपखंड परदेश आहे. हा पठारी प्रदेश उच्च सखल असून त्यात नद्यांची खोरी आहेत. जलप्रवाहाच्या सीत्रेमुळे काही ठिकाणी गाळाच्या जमिनीत तयार झाल्या आहेत. जिल्ह्याचा सर्व भागात डेक्कन ट्रॅप या नावाने ओळखले जाणारे बेसाल्ट खडकाचे आडवे पसरलेले थर पहावयास मिळतात सामान्यत: आर्थिकदृष्ट्या महत्वाचे खनिजे जिल्ह्यात आढळून येत नाहीत. सन २०११ या वर्षी झालेल्या (पंधराव्या) स्वातंत्र्यनंतर ७ व्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,७७,३४५ असून त्यापैकी ६०,६२९४ पुरुष तर ५७,१०५१ स्त्रिया आहेत. त्याची एकूण लोकसंख्या टक्केवारी अनुक्रमे ५१.५० व ४८.५० टक्के एवढी आहे. हिंगोली जिल्ह्याचा एकूण लोकसंख्येपैक. ८४.८१% लोक खेड्यात राहतात तर १५.१९ % लोक शहरात राहतात जिल्ह्यात २०११ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषांमागे 942 स्त्रिया आहेत.

बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक आढावा :-

जागतिक स्थिती :-

जगातील १.३ अब्ज लोक बहुआयामी गरीब आहेत. यापैकी जवळपास अर्धे (६४४ दशलक्ष) १८ वर्षांखालील मुले आहेत.सुमारे ८५% बहुआयामी गरीब उप सहारा आफ्रिका (५६६ दशलक्ष) आणि दक्षिण आशिया (५३२ दशलक्ष) मध्ये राहतात. ६७% पेक्षा जास्त बहुआयामी गरीब मध्यम उत्पन्न असलेल्या देशामध्ये राहतात.

भारताची स्थिती :-

भारतातील सर्वाधिक ३८१ दशलक्ष लोक बहुआयामी दारिद्र्यखाली राहतात. भारतात ६ पैकी ५ लोक बहुआयामी गरीब लोक आहेत. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकामध्ये भारत १०९ या देशाचा यादीत भारताचा ६६ वा क्रमाक आहे.

महाराष्ट्र स्थिती :-

महाराष्ट्रातील गरिबांचे प्रमाण १४.९% टक्के आहे.

निती आयोग :-

निती आयोगाने वेगवेगळ्या निकषावर आधारित गरिबाची संख्या निश्चित केली असून त्यामध्ये देशातील २५.०१% नागरिक गरीब असल्याचे आढळून आले आहे.

मराठवाडा बहुआयामी गरीब :- मराठवाडा जिल्ह्यातील बहुआयामी गरीब २०२१ च्या निती आयोगाच्या अहवालानुसार मराठवाड्यातील हिंगोली २८.०५ % जिल्हा सर्वात गरीब म्हणून आढळून आले आहेत.

अभ्यासाची आवश्यकता :-

बहुआयमी दारिद्र्य निर्देशांक ही संकल्पना जागतिक पातळीवर त्याचा उपयोग केला जात आहे. ही संकल्पना विकसनशील देशासाठी याचा वापर केला जातो. हा विषय निवडण्याचा पाठीमागे फक्त एकच हेतू आहे. की, हिंगोली जिल्हामध्ये दारिद्र्याची स्तिथी , शिक्षण, आरोग्य, राहणीमान स्तिथी इत्यादी. बहुआयामी ही संकल्पना जागतिक पातळीवर निर्देशांक काढण्यात आलेला आहे. परंतु , जिल्हा पातळी, व तालुका पातळी त्याचा स्वतंत्र असा अभ्यास केलेला नाही. म्हणून मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याची सध्याची स्थिती लक्षात घेता तो निती आयोग मापन केलेल्या आकडेवारी नुसार सर्वात गरीब आहे. महाराष्ट्र राज्य आणि हिंगोली जिल्ह्याची तुलना केली असता असे लक्षात येते की, हिंगोली जिल्हा हा महाराष्ट्र पेक्षा दुप्पट दारिद्र्याचे प्रमाण आहे. म्हणून हिंगोली जिल्ह्याचा बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक : तालुका निहाय अभ्यास. हा विषय अभ्यास केल्यानंतर हिंगोली जिल्हा गरीब असण्याची कारणे आणि तेथील अर्थव्यवस्था स्थिती लक्षात येईल. विशेष म्हणजे दारिद्र्य प्रमाण आणि तीव्रता किती आहे. किती लोक बहुआयामी गरीब आहेत.

संशोधन संशोधनाची उद्दिष्टे:-

१). हिंगोली जिल्ह्यासाठी बहुआयामी दारिद्र्याचे निर्देशांक वापरून दारिद्र्याचे विश्लेषण करणे.

२). हिंगोली जिल्ह्यातील दारिद्रायचे प्रमाण आणि दारिद्र्याचे तीव्रता अभ्यासणे.

३). हिंगोली जिल्ह्याचा तालुका निहाय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक तयार करणे.

४). हिंगोली जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचा अभ्यास करणे.

५). हिंगोली जिल्ह्याचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

६). हिंगोली जिल्हातील दारिद्र्य दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची गृहीतके :-

१). मराठवाडा मध्ये हिंगोली जिल्हा बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक सर्वात अधिक २८.०५ एवढे आहे.

२). हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात दारिद्र्यचे प्रमाण सर्वात अधिक आहे.

३). हिंगोली जिल्ह्यातील शिक्षण, आरोग्य ,राहणीमानाचा दर्जा घसरत आहे.

४). हिंगोली जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण वाढत आहे.

५). हिंगोली जील्यातील तालुका निहाय *दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे.*

६). हिंगोली जिल्ह्यातील दारिद्र्याची विषमता वाढत आहे.

७). हिंगोली जिल्ह्यातील दारिद्र्याची तीव्रता वाढत आहे.

संशोधन पद्धती:-

सदरील अभ्यास हा प्राथमिक व तसेच द्वितीय अशा दोन्ही सामग्री वर आधारित आहे. अभ्यासासाठी आवश्यक संदर्भग्रंथ, माहितीपत्रके, वार्षिक अहवाल ,जागतिक बहुआयामी निर्देशांक अहवाल, अध्ययन विषयाशी निगडित, प्रकाशित झालेले पेपर, शोध प्रबंध, साहित्य व माहिती संकलित करण्यात येणार असून मासिक लेख व अंक इत्यादीचा. आधार घेण्यात येणार आहे. सदर संशोधन विषयाच्या अभ्यास करण्यासाठी प्राथमिक साधनसामुग्रीचा आधार घेण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुक्यातील प्रत्येकी ८० नमुन्याची असे एकूण ४०० नमुने यादृच्छिक पद्धतीने निवड केली जाणार आहे. प्रत्येक तालुक्यातून ८ गावांची निवड करून त्या प्रत्येक गावातून १० नमुन्याची निवड करून त्यांच्याकडून मुलाखत आणि सर्वेक्षण, निरीक्षण याद्वारे माहिती जमा केली जाणार आहे. जमा झालेल्या माहितीवर यु. एन. डी. पी. ने ठरवलेल्या बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक, त्या निकषावर अवलंबून हिंगोली जिल्ह्याचा तालुक्यांचा बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक काढून त्याचा अभ्यास केला जाणार आहे.

अभ्यासाचे महत्त्व :-

उपरोक्त संशोधन हा धोरणकर्ते, संशोधक, शासकीय कामासाठी, व शासनाच्या योजना, खाजगी संस्था, दारिद्र्य निर्मूलन इत्यादी. उपयोगात येईल आणि योजना राबवण्यात पण सरकारला त्या आधारे मदत होईल.

अभ्यासाच्या मर्यादा:-

पहिले दारिद्र्य मोजमापासाठी उत्पन्न व उपभोग विचारात घेत आणि त्यानुसार दारिद्र्याचे मोजमाप केले जात असे' परंतु , आपल्याला दारिद्र्याची विविध अंगाने अभ्यास करणे गरजेचे आहे. तरच आपल्याला दारिद्र्याची विषमता आणि राहणीमानातील फरक ,गरीब आणि श्रीमंत वाढत असलेली दरी हे

आपण बहुआयामी दारिद्य निर्देशांक याचे निकष वापरून आपण त्याचा अभ्यास करणार आहोत. हिंगोली जिल्ह्याचा बहुआयामी दारिद्य निर्देशांक हा एक अभ्यास सदरील संशोधनाचा विषयाचा अभ्यास करीत असताना हिंगोली जिल्ह्यातील तालुका निहाय निर्देशांक काढण्यासाठी निर्देशांक संशोधन पद्धती डोळ्यासमोर ठेवून निर्देशांक काढण्यात येणार आहेत. सदर विषयाचा अभ्यास करताना उद्दिष्टे ला धरून बहुआयामी दारिद्य निर्देशांक आवश्यक असणारे परिस्थिती त्या संबंधित घटकांचा अभ्यास केला जाणार आहे. या व्यतिरिक्त अभ्यास केला जाणार नाही, म्हणून या अभ्यासाच्या मर्यादा आहेत,असे आपल्याला

म्हणता येईल केवळ हा निर्देशांक हिंगोली जिल्हा पुरताच मर्यादित आहे. इतर जिल्ह्याचा विचार अजिबात केलेला नाही. हेच या संशोधन विषयाच्या मर्यादा आहेत ,असे आपल्याला म्हणता येईल.

प्रकरणाची रचना :-

१). प्रस्तावना आणि संशोधन पद्धती.

२). साहित्याचा आढावा.

३). हिंगोली जिल्ह्यातील तालुका निहाय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक.

४). हिंगोली जिल्ह्याची आर्थिक स्थिती व दारिद्र्याची विषमता.

५). निष्कर्ष आणि शिफारसी.

संदर्भग्रंथ :-

१). Akire, S. And Santos , (M.E. 2010). ' Acute Multidimensional Poverty: A New Index For Developing Countires' . Ophi Working Paper 38, Oxford University ; Also Published As Humen Development Research Paper 2010/11.

२). Alkire, S. And Santos, M.E. (2014). Measuring Acute Poverty In The Developing World: Robustness And Scope The Multidimensional Poverty Index'. World Development, 59: 251-274.

३). Bosman Kristof, Decancq Koen, Ooghe Erwin. What Do Normative Indices Of Multidimensional Really Measure? Journal Of Public Economics ISSN 0047-2727-130 (2015), P. 94-104.

४). National multidimensional poverty index baseline report NITI Aayog ***https://www.niti.gov.in***

५). The oxford poverty and Human Development Inititative (OPHI), ***www.ophi.org.in***

६). हिंगोली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा व सांख्यिकी कार्यालय, हिंगोली २०२१ .प्रशासकीय इमारत, s4 दुसरा मजला जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, हिंगोली.

७). हिंगोली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई, २०१७ .

८). रोजगार नोकरी संदर्भ न्यूज पेपर. अंक 5, पान नं. 5. मंगळवार 25 जानेवारी ते 31 जानेवारी २०२२ .

९). ज्योत्स्ना देशपांडे: विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन नागपुर, २०११ .

१०).लोकमत न्यूज पेपर औरंगाबाद मुख्य पान नं.10. 23 डिसेंबर २०२१.

११).जे. एफ. पाटील सार्वजनिक अर्थकारण, फडके प्रकाशन कोल्हापूर २०११.

१२). महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई, २०२०-२१.

-:मार्गदर्शक:-
प्रा. डॉ. एम. एन. बिरादार
सहयोगी प्राध्यापक.
(अर्थशास्त्र)
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर,
(ता. भोकर जि. नांदेड.)

-:संशोधक:-
चव्हाण उदयराज चंदन